# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## कर सहायक (मुख्य) परीक्षा-2017
### -- अंतिम निकाल —
### घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. 31 डिसेंबर, 2017 रोजी "कर सहायक (मुख्य) परीक्षा **2017"** एकूण 296 पदांकरिता घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेसाठी संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेले दावे निकालासाठी विचारात घेऊन सदर दाव्यांच्या अनुषंगाने शिफारसपात्र उमेदवारांची पात्रता शासन स्तरावर, मूळ प्रमाणपत्रांआधारे तपासण्याच्या अधीन राहून, सदर परीक्षेचा निकाल दि. 21 एप्रिल, 2018 रोजी जाहीर करण्यात आला आहे.

2. सदर परीक्षेमधे बीड येथील श्री. शिंदे अजित अवधूत (**PN001051**) हे राज्यात प्रथम आले आहेत. मागासवर्गवारीतून अहमदनगर येथील श्री.पाटसकर अमित अनिल (**PN001078**) तसेच महिलांमध्ये पुणे येथील श्रीमती कोलेकर सुजाता मोहन (**PN005190**) ह्या प्रथम आल्या आहेत.

3. प्रस्तुत निकालाआधारे शिफारसपात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्याप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दि. 1 जुलै, 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दि.18 ऑगस्ट, 2016 रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-क पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा विहित दिनांकाचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल नियुक्ती प्राधिका-यांकडे नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील.

4. प्रस्तुत परीक्षेच्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांनी "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्र. 3.8 पहावी).

ठिकाण : मुंबई

दिनांक : 21 एप्रिल, 2018

**सु. सं. केसरकर**
**उपसचिव (परीक्षा-2)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**